**महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचा सन २०२१-२२ या वर्षाचे वार्षिक लेखे (६० वा वार्षिक अहवाल) विधानमंडळास सादर करण्यास झालेल्या विलंबाची कारणे खालील प्रमाणे आहेत :-**

१. महामंडळाच्या वित्त व लेखा विभागतील बहुतांश अधिकारी व कर्मचारी निवृत्त झालेले आहेत. सन २०२१-२०२२ पासून महामंडळाच्या मुख्य वित्त अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार महाव्यवस्थापक/व्यवस्थापक यांच्याकडे सोपविण्यात आला होता महामंडळाच्या मुख्य वित्त अधिकारी पदावर नियमित अधिकारी नसल्यामुळे व अपुऱ्या मनुष्यबळामुळे लेखे लिहिण्यात विलंब झाला.
२. सद्यस्थितीत महामंडळामध्ये ०९ स्थायी कर्मचारी आहेत व त्यापैकी वित्त व लेखा विभागात फक्त ०२ स्थायी कर्मचारी आहेत महाराष्ट्र शासनाचा रॅम्प अंतर्गत येणारा कार्यक्रम महामंडळ राबवत आहे व त्यासाठी वित्त व लेखा विभागाच्या कर्मचाऱ्यांचा बराचसा वेळ खर्च केला जातो वित्त व लेखा विभागातील कामे कंत्राटी कर्मचारी व बाहय नेमणूक सी ए फर्म कर्मचारी मार्फत केली जातात.
३. महामंडळाच्या वित्त व लेखा विभागात अद्याप मुख्य वित्त अधिकारी या पदावर नियुक्ती करण्यात आलेली नाही.

महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचा सन २०२१-२२ या वर्षाचे वार्षिक लेखे (६० वा वार्षिक अहवाल) अंतिमत: तयार होईपर्यंत अनुक्रमानुसार घटनांची माहिती :-

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | वार्षिक लेख्यांचे वैधानिक लेखापरीक्षण सुरू केल्याची तारीख | २५/०९/२०२४ |
| २ | संचालक मंडळाच्या ३८१ व्या बैठकीत लेखे मंजूर झाले | २६/०९/२०२५ |
| ३ | संचालक मंडळाने अहवालास मान्यता दिल्यानंतर महालेखापालांना कार्यालयास अहवाल सादर केल्याची तारीख | २१/११/२०२५ |
| ४ | महालेखापाल कार्यालयाने अहवालाची तपासणी केली व त्यात काही प्रशासकीय पध्दतीची दुरुस्ती सुचविली. | २७/०३/२०२६ |
| ५ | अहवाल छपाईसाठी दिल्याची तारीख | ११/०५/२०२६ |
| ६ | अहवालाची इंग्रजी / मराठी भाषेतील मुद्रीत प्रती प्राप्त झाल्याची तारीख | २९/०६/२०२६ |
| ७ | छपाई झालेले अहवाल महामंडळाने स्वीकृत केल्याची तारीख | २९/०६/२०२६ |
| ८ | महामंडळाने स्वीकृत केलेले अहवाल विधानमंडळास सादर करण्यासाठी शासनाकडे पाठविण्याची तारीख | ०२/०७/२०२६ |

४. त्यामुळे अहवाल विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात विहित मुदतीत सादर करता आलेला नाही. हा विलंब क्षमापित करुन सदर अहवाल महाराष्ट्र विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात सादर करण्यास अनुमती द्यावी, ही विनंती.

(अजित सासुलकर)
उप सचिव (उद्योग), महाराष्ट्र शासन

एन्च ३५६-४